# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

जा.क्र.2020/गो.शा.1/करोना/कावी दिनांक 19/04/2020.

प्रति,

सर्व कार्यालय प्रमुख(मग्रारोहयो)

**विषय :- मनरेगा अंतर्गत कामे सुरु करणे बाबत.**

**संदर्भ**:-1.या कार्यालयाचे आदेश जा.क्र. 2020/डिसी-1/Crpc-144/कावी –दिनांक 13/04/2020.

2.महाराष्ट्र शासन अधिसुचना दिनांक 17/04/2020.

उपरोक्त विषयान्वये आपणयास कळविण्यात येते की, जागतिक आरोग्य संघटनेने करोना (कोव्हीड-19) या विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केलेला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात,महाराष्ट्रातील शहरात गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. तसेच राज्य शासनाने करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोकण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 कायदयातील खंड 2,3 व 4 मधील तरतुदी नुसार अधिसुचना निर्गमीत केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. तसेच भारत सरकार आरोग्य मंत्रालय महाराष्ट्र शासन आरोग्य मंत्रालय यांनी जाहीर केल्याप्रमाणे करोनाग्रस्त रुग्णाचे इतर लोकांनी संपर्कात येऊ नये तसेच सार्वजनिक किंवा खाजगी ठिकाणी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे इत्यादी बाबीमुळे या विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्व सामान्य जनतेस व त्यांच्या आरोग्यास धोका होऊ नये या करीता या कार्यालयाचे संदर्भ क्र. 1 च्या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये मनाई आदेश काढण्यात आले होते.

संदर्भ 2 अन्वये राज्य शासनाने लाकडाऊन संदर्भात नवीन सर्व समावेश अधिसुचना जारी केली असुन या अतिरिक्त औद्योगिक घटकासह शेती विषयक बाबी बाधकाम क्षेत्र आदीना अधिक सुट देण्यात आली आहे. तसेच सोशल डिस्टींगच्या नियमाचे पालन करुन मनरेगा अंतर्गत कामे दि.20/04/2020 पासुन सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.

त्याअनुषंगाणे मनरेगा अंतर्गत कामांना लॉकडाऊन च्या काळात सुट देण्यात आली असुन त्यामध्ये सिंचन आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्यात यावे असे सुचीत केले आहे त्यानुसार सदरची काम सुरु करुन काम करते वेळेस सोशल डिस्टिंग (सामाजिक अंतराच्या ) नियमांचे पालन करुन तसेच मंजुरांनी चेह-यावर मास्कचा वापर करुन मनरेगाची कामे करता येईल.याची आपल्या स्तरावरुन दक्षता घ्यावी तसेच सदर कामे खालील अटी व शर्तीच्या आधारे सुरु करता येतील.

1. कामावर आलेल्या कामगार यांची नोंद ठेवणे गरजेचे आहे जसे की, नाव संपर्काचा पत्ता व मोबाईल क्रमांक.
2. कामगारांनी नेहमीच नाक आणि तोंड मास्कने पुर्णपणे झाकुन ठेवणे बंधनकारक आहे.
3. काम करण्यासाठी आलेल्या दोन कामगारामध्ये एक मिटरचे अंतर राहिल याची दक्षता संबंधित अधिकारी यांनी घ्यावी.
4. करोना प्रादुर्भाव असलेल्या भागातुन कामगारांची ने आण करण्यास मनाई असेल.
5. दररोज कामवर येणा-या कर्मचारी /कामगाराची तपासणी थर्मल गन च्या सहाय्याने करावी करण्यात यावी.

Scanned by CamScanner

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450


6. मनरेगा अधिकारी/कर्मचारी/कामगारासाठी मास्क व Sanitizer उपलब्ध करुन देण्यात यावे.
7. कामाच्या परिसरामध्ये कर्मचारी/कामगारासाठी पिण्याच्या पाण्याची व हात धुण्याच्या पाण्याची व्यवस्था योग्य ठिकाणी करण्यात यावी व पाणी उपलब्ध राहिल याची दक्षता घेण्यात यावी.
8. शासनाने ठरवुन दिलेल्या अंतराच्या परीसीमांचे तंतोतंत पालन करुन कामाच्या ठिकाणी व परिसरामध्ये सामाजिक अंतराचे (Social Distance) पालन करण्यात यावे व सुरक्षतेच्या उपाययोजनाचे माहिती फलक लावण्यात यावेत.

उपरोक्त प्रमाणे नमुद केलेल्या अटी व शर्तीचे पालन न करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था अथवा समुह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. व तसेच सदर कामे सुरु केल्या बाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

-sd-

(रुचेश जयवंशी)

जिल्हादंडाधिकारी हिंगोली

प्रतिलीपी

1.मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितहस्तव
2. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहिस्तव
3. वन अधिकारी हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहिस्तव
4. उपजिल्हाधिकारी (रोहयो) जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहिस्तव
5. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहिस्तव
6. उप संचालक सामाजिक वनीकरण हिंगोली यांना आवश्यक त्या कार्यवाहिस्तव
7. तहसिलदार हिंगोली/कळमनुरी/वसमत/औंढा/सेनगाव यांना आवश्यक त्या कार्यवाहिस्त
8.गटविकास अधिकारी हिंगोली/कळमनुरी/वसमत/औंढा/सेनगाव यांना आवश्यक त्या कार्यवाहिस्त

(रुचेश जयवंशी)

जिल्हादंडाधिकारी हिंगोली

Scanned by CamScanner